जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा.
सेशन पोलीस प्रॉसिक्युशन स्क्वॉड, सातारा.
( साक्षीदार अभ्यागत कक्ष )

**प्रेस नोट दिनांक - ०७/०७/२०२६**

**मारहाण करुन लुबाडल्याने आरोपीस ०१ महिना साधी कैद व रु.२६,०००/- दंडाची शिक्षा.**

**रहिमतपूर** - दि.११/१०/२०२० रोजी सकाळी ०७.३० वा.चे सुमारास यातील **फिर्यादी नामे फिरोज महमद कसाई वय ४० वर्षे व्यवसाय - मटण शॉप रा.रहिमतपूर ता.कोरेगाव जिल्हा सातारा** हे नेहमीप्रमाणे त्यांचे मोटार सायकलवरुन चौकीचा आंबा येथे स्वत:चे मटणाचे दुकान उघडणेकरिता गेले असता त्यानंतर फिर्यादी हे दुकानातील मटण संपलेने दुकान बंद करुन सायंकाळी ०६.३० वा.चे सुमारास मोटार सायकलवरुन रहिमतपुर येथील घरी जाणेकरिता निघाले तेंव्हा चौकीचा आंबा येथुन वरचे अंभेरी मार्गे ०६.४५ वा.चे सुमारास अंभेरी घाटातुन घाट उतरत येत असताना घाटाचे शेवटचे वळणावर अचानक ३० ते ३५ वयोगटातील **आरोपी नामे विशाल कैलास पाटोळे वय २३ वर्षे रा. एस.टी.स्टँड शेजारी औंध ता.खटाव जि.सातारा** याने फिर्यादीची मोटार सायकल अडवुन जबरदस्तीने थांबवून त्यांच्या डोळयात मिरचीपुड टाकुन ओढत ओघळीतील झाडीत नेवुन लाकडी दांडक्याने व लाथाबूक्याने मारहाण करून जखमी करून त्यांच्या जवळील रोख रक्कम व सॅमसंग कंपनीचा मोबाईल, आधारकार्ड असे रुपये ३५,२००/- किंमतीचा माल जबरदस्तीने काढुन घेतला आहे. म्हणून वगैरे मजकुरची फिर्यादी वरुन रहिमतपूर पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचा तपास करुन **तत्कालीन तपासी अधिकारी श्री. घनश्याम बल्लाळ पोलीस निरीक्षक रहिमतपूर पोलीस ठाणे** यांनी मा.न्यायालयात सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र पाठवण्यात आले होते.

सदरचा खटला **मा. श्री.एस.आर.तांबोळी, जिल्हा व सत्र न्यायाधीश (DJ २) सो सातारा** यांचे कोर्टात चालला होता. **सरकारतर्फे श्रीमती अनुराधा शंकरराव निंबाळकर अतिरिक्त जिल्हा सरकारी अभियोक्ता, सातारा** यांनी खटल्याचे कामकाज पाहिले. नमुद केसमध्ये एकुण **१२ साक्षीदार** तपासले. परिस्थितीजन्य पुरावा तसेच अन्य साक्षीदारांचे साक्षीवरून व जिल्हा सरकारी वकील यांचा युक्तीवाद व आरोपीने केलेल्या कृत्याबाबत मा.उच्च न्यायालय,सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे यांचे दाखले न्यायालयात सादर केलेने समोर आलेला पुरावा ग्राहय मानुन मा.न्यायाधीश सो **श्री.एस.आर.तांबोळी, जिल्हा व सत्र न्यायाधीश (DJ २) सो सातारा** यांनी आज **दि.०७/०७/२०२६ रोजी यातील आरोपी यास भा.द.वि.स.क. ४११ अन्वये ०१ महिना साधी कैद व रु.२६,०००/- दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात आली आहे.**

**मा. श्री. निखील पिंगळे पोलीस अधीक्षक सातारा, मा. डॉ. वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती राजश्री तेरणी उपविभागीय पोलीस अधिकारी कोरेगाव विभाग कोरेगाव व श्री. विनोद नेवसे सहाय्यक पोलीस निरीक्षक रहिमतपूर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणुन विनोद मोरे पो.कॉ ब.नं.१३५६ रहिमतपूर पोलीस स्टेशन यांनी कामकाज पाहिले.**

**पोलीस अधीक्षक सातारा करीता.**